पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- ०९/१२/२०१९

## जिवे ठार मारणाऱ्या आरोपीस आजीवन कारावासाची शिक्षा तसेच ५,०००/- रुपये दंड

=> जिल्हा सत्र न्यायाधीश, गडचिरोली श्री. स्वप्नील खटी यांचा न्यायनिर्णय

दिनांक १९/१२/२०१६ रोजी सायंकाळी ०६:३० वा. दरम्यान आरोपी बाबुलाल चमरु नैताम वय ५० वर्ष रा. टाहकाटोला ता. कोरची जि. गडचिरोली हा मृतक नामे दारसु देवसाय पुडो यांच्या हल्लयात ठक्कर झाली असता आरोपीचे हल्याला रक्त लागल्याने आरोपी राग मनात घेवुन स्वत: जवळ असलेले कुऱ्हाळीचे मागच्याबाजुनी मृतक दारसु देवसाय पुडो वय ३५ वर्ष रा. रा. टाहकाटोला ता. कोरची जि. गडचिरोली याचा डोक्याचा मागील बाजु जोराने वार केल्यावर तो खाली पडला. खाली पडल्यानंतरही एक-दोन वेळा मारले असता सदर व्यक्तीचा मयत झाला. व अंधार झाल्यानंतर प्रेताला शेतातील विहीरजवळ जांबाच्या झाळाला त्याच्याच लुंगीने गडफास लावुन लटकावुन ठेवला.

रात्रो मृतक घरी न आल्याने त्याची पत्नी दिनांक २९/१२/२०१६ रोजी सकाळी ०७:०० वा. मुलांसोबत आजुबाजुच्या परिसरात शोध घेत असतांना त्यांचे शेतावरील विहीरजवळ जांबाच्या झाळाला तिचे पती मृतक दारसु पुडो हा गळफास घेवुन मृत अवस्थेत दिसला. त्यास जवळुन पाहीले असता त्याचा डोक्याला मागच्या बाजुस तिक्ष्ण धारदार हत्याराने मारल्याचा निशाण दिसत असुन रक्त खाली पडत होता.

त्यानंतर आरोपी नामे बाबुलाल चमरु नैताम यांच्यावर संशय घेवुन त्याचे विरुध्द पोमके बेडगाव येथे फिर्याद दिले व पोस्टे कोरची येथे अप.क्र. ३६/२०१६ कलम ३०२ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले असुन पोलीसांनी तपास पुर्ण करुन आरोपी विरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. सरकार तर्फे फिर्यादी व ईतर साक्षीदारांचे बयाण तसेच सरकारी पक्षाचा युक्तीवाद ग्राह्य धरुन मा. न्यायालयाने आज दिनांक ०९/१२/२०१९ रोजी आरोपी यास मा. प्रमुख व सत्र न्यायाधीश, गडचिरोली यांनी कलम ३०२ भादवी मध्ये आजन्म कारावासाची शिक्षा तसेच ५,०००/- रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली.

सरकार पक्षातर्फे सहा. जिल्हा सरकारी वकील श्री. एस.यु. कुंभारे यांनी काम पाहिले. तसेच गुन्हाचा तपास पोउपनि शेखर शब्बीर खॉ तडवी पोमके बेडगाव यांनी केले. तसेच कोर्ट पैरवी अधिकारी म्हणुन पोनि श्री. प्रकाश तुनकलवार यांनी कामकाज पाहीले आहे.